पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
NAAC Accredited-2022 'B++' Grade (CGPA 2.96)
Telephone No. 0217-2744777-135, Website : sus.ac.in
Email Id : convocation@sus.ac.in
परीक्षा व मूल्यमापन विभाग (दीक्षांत विभाग / Convocation Department)

जा.क्र. पुअहोसोविसो/प.व.मू.मं/दीक्षांत/२०२५/1343 दिनांक : 16 JUL 2025

## परिपत्रक

शैक्षणिक वर्ष २००४-०५ पासून ते सत्र ऑक्टोबर २०२१ पर्यंत प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील व विद्यापीठ परिसर संकुलातील विविध अभ्यासक्रमांमध्ये उत्तीर्ण असणाऱ्या परंतू आजतागायत ज्यांनी पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी विद्यापीठाकडे अर्ज केलेला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना या परिपत्रकाअन्वये कळविण्यात येते की, दि. १७ जुलै, २०२५ ते ३१ जुलै, २०२५ यादरम्यान आपण विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी विहित शुल्क भरुन २१ व्या दीक्षांत समारंभाकरिता अर्ज करु शकता.

दि. १७ जुलै, २०२५ पासून विद्यापीठामध्ये येऊन पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणेची सुविधा बंद करण्यात येत आहे. सर्व विद्यार्थ्यांनी sus.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावरुन विद्यार्थी सहाय्यता केंद्रांतर्गत (Student Facilitation Centre) ऑनलाईन पध्दतीने पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठीचा अर्ज विद्यापीठास सादर करावा.

दि. १७ जुलै, २०२५ ते ३१ जुलै, २०२५ यादरम्यान तात्काळ पदवी प्रमाणपत्र मिळण्याची (ऑफलाईन व ऑनलाईन दोन्हीही) सुविधा बंद राहील.

दि. ०१ ऑगस्ट, २०२५ पासून तात्काळ पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज करण्याची ऑनलाईन सुविधा विद्यार्थी सहाय्यता केंद्रांतर्गत (Student Felicitation Centre) सुरु होईल. दि. ०१ ऑगस्ट, २०२५ पासून तात्काळ पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज करण्याची ऑफलाईन सुविधा बंद करण्यात आली आहे.

सबब, सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, दि. १७ जुलै, २०२५ पासून विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज करणेकरिता विद्यापीठामध्ये येण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त प्रमाणे ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा sus.ac.in या संकेतस्थळावर Student Facilitation Centre या मथळयाखाली उपलब्ध आहे.

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University ★ Board of Examinations And Evaluation,

आदेशान्वये,

(डॉ. श्रीकांत ग. अंधारे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत : मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये / विद्यापीठ संकुले यांना या परिपत्रकाची प्रत देऊन कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.